**बॉलिवूड कलाकार अर्जुन कपूर यांच्या हस्ते जगातील पहिली फ्रँचाईझी सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग लाँच**

सीएट टायटल प्रायोजक आणि टोयोटा हिलक्स या लीगची अधिकृत वाहन भागीदार

पहिला रेसिंग सीझन दिल्लीतील जेएलएन मैदानात ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू होणार

टीएम एसएक्सआयने खेळ बनवला अधिक सोपा, नवे मापदंड प्रस्थापित

दिल्ली, १ जून २०२३ - मोटरस्पोर्ट्स क्षेत्रात मोठी क्रांती येत असून बॉलिवूड अभिनेते आणि सुपरक्रॉसचा चाहते असलेल्या अर्जुन कपूर यांनी **सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग**चे अनावरण केले. या लीगचे फेडरेशन ऑफ मोटर स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडियाच्या (एफएमएससीआय) सहकार्याने आयोजन करण्यात आले आहे. ही लीग फ्रँचाईझी पद्धतीची पहिली सुपरक्रॉस रेसिंग लीग असून त्यामध्ये जगभरातील रायडर्स वेगवेगळे फॉरमॅट्स आणि विभागात खेळतील.

सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीग (आयएसआरएस) मोटरस्पोर्ट्स क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यायासाठी सज्ज आहे. सीएट आयएसआरएसची टायटल प्रायोजक, तर टोयोटा हिलक्स अधिकृत वाहन भागीदार आहे. ब्रँड्स आणि लीगमधील ही भागिदारी नाविन्य, कामगिरी आणि मर्यादा पार करण्याविषयीच्या समान ध्येयांतून करण्यात आली आहे.

शुभारंभाचा सीझन नवी दिल्लीतील प्रसिद्ध जवाहरलाल नेहरू मैदानात ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू होईल व त्यानंतर मुंबई, पुणे, अहमदाबादसारख्या प्रमुख शहरात त्याचे आयोजन केले जाईल. ऑक्टोबर ते डिसेंबर २०२३ दरम्यान या शहरातील चाहत्यांना कौशल्य, धाडसी मॅन्युव्हर्स, वेगवान अक्शन यातून उदयास येत असलेले नव्या प्रकारचे सुपरक्रॉस रेसिंग अनुभवता येईल.

‘सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगने मोटरस्पोर्ट्स चाहत्यांची मने जिंकण्याचे, त्यातल्या थराराची अनुभूती चाहत्यांना देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे,’ असे **सुपरक्रॉस इंडिया प्रा. लि. चे सह-संस्थापक आणि संचालक ईशान लोखंडे** म्हणाले. सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगचे (सीआयएसआरएल) लाँच भारतीय मोटरस्पोर्ट्स आणि वाहन उद्योगासाठी महत्त्वाची घटना आहे. तरुण रायडर्सना आपले कौशल्य दाखवण्यासाठी, आंतरराष्ट्रीय रायडर्ससह आपल्या गुणवत्तेचा विकास करण्यासाठी तसेच प्रायोजक आणि उत्पादकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी व्यासपीठ पुरवण्याचे ध्येय लीगने ठेवले आहे. वाहन उत्पादकांनाही यात आपली अत्याधुनिक उत्पादने व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान सादर करण्याची संधी मिळणार आहे. आयएसआरएल हे भारतात मोटरस्पोर्ट्सचा विकास करण्याच्या दिशेने टाकलेले सकारात्मक पाऊल आहे. जागतिक स्पर्धांचे व्यासपीठ उपलब्ध झाल्यामुळे या क्षेत्राचा वाहन उद्योगावर चांगला परिणाम होईल.

यारप्रसंगी **एफएमएससीआयचे अध्यक्ष श्री. अकबर इब्राहीम** म्हणाले, ‘भारतात मोटरस्पोर्ट्स संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी एसएक्सआय टीमने हाती घेतलेल्या उपक्रमाने फेडरेशन भारावून गेली आहे. या उपक्रमामुळे भारतात जागतिक गुणवत्ता येण्यास मदत होईल, शिवाय तरुण गुणवत्तेला भारतात व्यासपीठ मिळेल. या उपक्रमामुळे या खेळात भारताला जागतिक नकाशावर स्थान मिळेल.’

**श्री. अर्जुन कपूर** म्हणाले, 'लहानपणापासूनच मला सुपरक्रॉस रेसिंगमधला थरार आकर्षित करत आला आहे. आज या अद्‌भुत वातावरणात, गरजणाऱ्या इंजिन्सच्या सहवासात वावरताना मी भारावून गेलो आहे. सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगमध्ये जगातील सर्वोत्तम रायडर्स एकमेकांना कडवी टक्कर देतील, शिवाय सुपरक्रॉसचा थरार व आनंद पुढच्या पिढ्यांना अनुभवता यावा म्हणून नवा मार्ग आखून देतील.'

सीएट लिमिटेडचे प्रमुख विपणन अधिकारी श्री. लक्ष्मीनारायणन बी *म्हणाले,* 'सुपरक्रॉस रेसिंग लीगचे टायटल प्रायोजक होताना आम्हाला अभिमान वाटत आहे. स्पर्धात्मक क्रीडा कार्यक्रमांचा थरार, त्यासाठी वाटणारी तळमळ यांना पाठिंबा देण्याची आमची जुनी परंपरा या निमित्ताने परत अधोरेखित झाली आहे. २०१४ पासून सीएट डर्ट बायकिंग क्षेत्रात कार्यरत असून २०२३ मध्ये कंपनी नवी ग्रिप एमएक्स रेंज सादर करणार आहे. सीएटचे आधुनिक आणि उच्च कामगिरी करणारे टायर्स सुपरक्रॉसच्या आव्हानात्मक प्रदेशासाठी अगदी योग्य आहेत. त्याची चांगली पकड रायडर्सना आवश्यक नियंत्रण मिळवून देते. टायटल प्रायोजक या नात्याने आम्ही सुपरक्रॉस रेसिंगचा थरार आणि उर्जा उंचावण्याचे ध्येय ठेवले आहे. एक दमदार सीझन अनुभवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. या उर्जादायी खेळाचा भाग होऊन भारतातील त्याच्या विकासासाठी व लोकप्रियतेसाठी योगदान देताना आम्हाला अभिमान वाटत आहे.'

**टोयोटा किर्लोस्कर मोटरच्या विक्री आणि धोरणात्मक विपणन विभागाचे उपाध्यक्ष श्री. अतुल सूद** म्हणाले, 'पहिल्यावहिल्या भारतीय सुपरक्रॉस रेसिंग लीगसाठी अधिकृत वाहन भागीदार होताना आम्हाला आनंद होत आहे. या प्लॅटफॉर्ममुळे आम्हाला टोयोटा हिलक्ससारख्या ऑफ- रोडिंगसाठी प्रसिद्ध असलेल्या कंपनीबरोबर खास सुपरक्रॉस बाइक्सची वाहतूक करण्यासाठी आवश्यक मदत करण्याची संधी मिळाली आहे. जगभरातील मोटरस्पोर्ट्सरोबर आम्ही दीर्घकाळापासून काम करत आहोत आणि आता भारतात इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगला पाठिंबा देताना आम्हाला आनंद होत आहे.'

सीएट इंडियन सुपरक्रॉस रेसिंग लीगची पालक कंपनी टीम एसएक्सआय या उपक्रमाच्या केंद्रस्थानी असून त्याचे नेतृत्व माजी आंतरराष्ट्रीय रेसर्स ईशान लोखंडे, वीर पटेल आणि अश्विन लोखंडे करत आहेत. त्यांनी या खेळाचा अनुभव आणि त्याविषयी वाटणाऱ्या ध्यासाच्या मदतीने बारकाईने सर्व आयोजन केले आहे, त्यातील कच्चे दुवे जोडले आहेत आणि जागतिक पातळीवर सुपरक्रॉसची समीकरणे नव्याने प्रस्थापित होतील यावर भर दिला आहे. या खेळाचे सखोल ज्ञान आणि गुणवत्तेच्या मदतीने त्यांना सुपरक्रॉसचे नवे युग सादर करत जगभरातील चाहत्यांना आकर्षित करायचे आहे.

**About CEAT INDIAN SUPERCROSS RACING LEAGUE:**

CEAT Indian Supercross Racing League (CISRL) is the world's first franchised-based Supercross league, a groundbreaking initiative that is set to revolutionize the way sports are perceived in India. It is here to create a global extravaganza, an awe-inspiring spectacle that will captivate Indian spectators like never before. CISRL have signed up with athletes around the world to compete in a variety of formats and categories, pushing the limits of their skills and inspiring the Indian riders to reach new heights. Prepare to be amazed as our stage performers break records of charismatic engagement, adding an extra layer of excitement to this premier motorsport event. The league is committed to providing a safe and competitive environment for riders of all ages and skill levels. The league also believes in giving back to the community and partnering with local organizations to promote youth development and environmental sustainability.

**FOR MEDIA QUERIES AND COMMUNICATIONS:**

Argho Ajay Mukherji: +91 9970829068 | argho.mukherji@adfactorspr.com